Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date 11 January 2025

Time 11.00 to 11.05 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक: ११ जानेवारी २०२५ सकाळी ११.०० वाजता.**

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या राष्ट्रीय युवा दिनानिमित्त दिल्लीतील भारत मंडपम् इथं तीन हजार युवा नेत्यांशी संवाद साधणार आहेत. स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय युवा दिन साजरा केला जातो. विकसित भारतासाठी एक लाख तरुणांना राजकारणात सहभागी करून त्यांना राष्ट्रीय व्यासपीठ उपलब्ध करून देणं हा या संवादाचा उद्देश आहे. यावेळी तंत्रज्ञान, शाश्वतता, महिला सक्षमीकरण, उत्पादन आणि शेती यासारख्या विषयांवरील दहा उत्कृष्ट निबंधांच्या पुस्तकाचे प्रकाशन पंतप्रधानांच्या हस्ते होणार आहे.

****

अयोध्येत रामलल्लाच्या प्राणप्रतिष्ठेला एक वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त आजपासून तीन दिवसांचा विशेष कार्यक्रम सुरू होत आहे. गेल्या वर्षी २२ जानेवारी रोजी प्राणप्रतिष्ठा झाली होती, परंतु तिथीनुसार आजपासून हा उत्सव साजरा केला जाणार आहे. यावेळी मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या हस्ते रामलल्लांचा अभिषेक होणार आहे.

****

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे फेब्रुवारी महिन्यात घेण्यात येणाऱ्या इयत्ता १२ वी परीक्षेसाठीचे ऑनलाईन प्रवेशपत्र उपलब्ध करून देण्यात आले आहे. सर्व शाळा आणि महाविद्यालयांना ऑनलाइन पद्धतीनं मंडळाच्या संकेतस्थळावरून प्रवेश पत्रे डाऊनलोड करता येणार आहेत, असं राज्य मंडळाचे सचिव देविदास कुलाळ यांनी कळवलं आहे.

****

शिर्डी इथं उद्या भारतीय जनता पक्षाचे राज्य अधिवेशन होणार आहे. यावेळी मंत्री मंगलप्रभात लोढा, संजय सावकारे, चंद्रकांत दादा पाटील, यांच्यासह भाजपचे मंत्री उपस्थित राहणार आहेत.

****

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाल्यानिमित्त छत्रपती संभाजीनगर इथं डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात आज अभिनंदन अभिजात मायमराठीला हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. यावेळी उद्योग आणि मराठी भाषा मंत्री उदय सामंत उपस्थित राहणार आहेत.

****

महाराष्ट्र राज्य कला संचालनालयातर्फे विद्यार्थी विभागाच्या ६४व्या महाराष्ट्र राज्य कला प्रदर्शनाचं उद्धघाटन केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते काल नागपूर इथं झालं. कलाकारांना प्रोत्साहन देण्यासाठी विविध उपक्रमांच्या माध्यमातून शासन उत्तम कार्य करत असल्याचं त्यांनी सांगितलं. यावेळी सात कला प्रकारात ३१ कलाकृतींना पारितोषिक आणि ३४ कलाकृतींना गुणवत्ता प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. या प्रदर्शनात विविध कला संस्थांमधील विद्यार्थ्यांच्या ९९३ कलाकृती ठेवण्यात आल्या आहेत.

****

बुलडाणा जिल्ह्यात सिंदखेडराजा इथं राष्ट्रमाता जिजाऊ जन्मोत्सवानिमित्त जिजाऊ गाथा महोत्सवाचं आयोजन करण्यात आलं आहे. राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या जन्मस्थळी या महोत्सवाचं काल उद्धघाटन झालं. सांस्कृतिक कार्य विभागामार्फत दोन दिवस विविध सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात येणार आहेत. प्रसिद्ध अभिनेत्री सोनाली कुलकर्णी यांच्यासह १०० कलाकारांच्या समूहानं 'जिजाऊ वंदना महाराष्ट्राची लोकधारा' हा ऐतिहासिक सांस्कृतिक कार्यक्रम काल सादर केला.

****

बीड जिल्ह्यातल्या वडवणी तालुक्यात देवडी इथं दरवर्षी पौष पौर्णिमेला राणुबाई देवीची यात्रा भरत असते. मात्र यावर्षी पौर्णिमा आणि मकरसंक्रांत एकाच दिवशी आल्यामुळे ही यात्रा दुसऱ्या दिवशी बुधवारी भरणार आहे. यासाठी व्यापारी तसंच भाविकांसाठी योग्य सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या असल्याची माहिती सरपंच अतुल झाटे यांनी दिली. या यात्रेदरम्यान १२ गाड्या ओढण्यात येणार आहेत. तर गुरूवारी कुस्ती स्पर्धा होणार आहेत.

****

छत्रपती संभाजीनगर इथं भारतीय शिक्षण प्रसारक मंडळाच्या त्रैवार्षिक शिबिराचं काल मंत्री अतुल सावे यांच्या हस्ते उद्घघाटन झालं. विद्यार्थ्यांना डिजिटल शिक्षणासोबतच राष्ट्रहिताची शिकवण देणं महत्त्वाचं असल्याचं प्रतिपादन सावे यांनी यावेळी बोलताना व्यक्त केलं. या तीन दिवसीय शिबिरात बारा विविध विषयांवर चर्चासत्र पार पडणार आहेत.

****

पुण्यातले गिरीप्रेमी संस्थेचे ज्येष्ठ गिर्यारोहक उमेश झिरपे यांना २०२३ चा, तेनसिंग नोर्गे राष्ट्रीय साहस जीवन गौरव पुरस्कार जाहीर झाला आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते १७ जानेवारीला दिल्ली इथं हा पुरस्कार प्रदान केला जाणार आहे.

****

अकोला जिल्हाधिकारी कार्यालयात शासनाच्या विविध योजनांची तसंच प्रकल्पांच्या अंमलबजावणीसाठी जिल्हा वॉर रूमची स्थापना करण्यात आली आहे. या कक्षाद्वारे शासनाच्या महत्त्वाच्या १४ योजनांचा नियमित आढावा घेण्यात येणार आहे. त्यानुसार समन्वयकांमार्फत नियमित आढावा सादर करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी अजित कुंभार यांनी विभागप्रमुखांना दिले आहेत.

****

क्वालालंपूर इथं सुरु असलेल्या मलेशिया खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या, चिराग शेट्टी आणि सात्विक साईराज रंकीरेड्डी या जोडीनं पुरुष दुहेरीची उपांत्य फेरी गाठली आहे. काल झालेल्या सामन्यात भारतीय जोडीनं मलेशियाच्या जोडीचा २६-२४, २१-१५ असा पराभव केला. उपांत्य फेरीत चिराग आणि सात्विकची लढत कोरियन जोडीशी होईल.

****